ePaper
इंडिया आघाडीचं विसर्जन निश्चित, नेतृत्वाबाबत अस्पष्टता भोवली, मित्रपक्षांनी काँग्रेसची साथ सोडली

वर्ष - 8 । अंक -181 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 10 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews





## आतील पानांत

- मोहम्मद शमी पुनरागमनासाठी सज्ज!
- मार्टिन गप्टिलची क्रिकेटमधून निवृत्ती!
- स्टील कारखान्यात चिमणी कोसळली!
- सिंगापूरचा पासपोर्ट पुन्हा पॉवरफुल



## बीड प्रकरणी अजित पवार यांची स्पष्टोक्ती

# पक्ष न पाहता दोषींना कठोर शिक्षा!

### ‘महाराष्ट्रात असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत

। मुंबई । महाईन्यूज

**पुणे : राज्यात गाजत असलेल्या बीड प्रकरणासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात भाष्य केले. ‘महाराष्ट्रात असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. निर्घृणपणे झालेली हत्या आहे. यात सरकारने लक्ष घातलेले आहे. तीन यंत्रणा तपास करत आहेत. हव्या तर आणखी यंत्रणा लावाव्यात. या प्रकरणी दोषींना पाठीशी घातले जाणार नाही, कठोरातील कठोर शिक्षा केली जाईल. वेगळ्या प्रकारचा संदेश राज्यात दिला जाईल,’ अशी स्पष्टोक्ती पवार यांनी केली.**



पुणे शहर आणि जिल्ह्यातील विविध विषयांसंदर्भात पवार यांनी गुरुवारी बैठका घेतल्या. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. बीड प्रकरणाबाबत एसआयटी, सीआयडी, न्यायालय अशा तीन यंत्रणांकडून चौकशी सुरू आहे. जो कोणी दोषी असेल, संबंधित असेल, ते सिद्ध झाल्यावर ताबडतोब कारवाई केली जाईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. तसेच पक्ष वगैरे न पाहता, वरिष्ठ पातळीवरील कोणी व्यक्ती दोषी असल्यास गय करण्याचे कारण नाही, असे मीही मुख्यमंत्र्यांना सांगितले आहे.

त्यामुळे चौकशी चालली आहे. आरोपी सापडायला विलंब लागला. मात्र कोणी कोणाला फोन केले हे सगळे आता समजते. तीन यंत्रणा बारकाईने तपास करत आहेत. अहवालात काही तफावत झाल्यास प्रत्येकाच्याच विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होणार आहे. तसेच या प्रकरणी राजकारण आणू देणार नाही, असे त्यांनी नमूद केले.

विरोधी पक्षातील, सत्ताधारी पक्षातील काहींनी बोलताना कोणावर अन्याय होऊ नये ही खबरदारी घेतली पाहिजे. आरोप करण्यापेक्षा पुरावे तपास यंत्रणांना द्यावेत. त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा झाली आहे, असे पवार यांनी धस यांचे नाव न घेता सांगितले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचं प्रकरणावर लक्ष



पिंपरी चिंचवड : खासदार सुप्रिया सुळे यांनी वाल्मिक कराड प्रकरणात राजकारण करू नये अशी विनंती भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. ईडीची नोटीस देऊनही वाल्मिक कराडवर कारवाई का? झाली नाही. असा प्रश्न सुळे यांनी सरकारला विचारला होता. यावर बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. बीडच्या प्रकरणात राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः लक्ष देत असून आरोपींना शिक्षा भेटणारच असा विश्वासही बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. चंद्रशेखर बावनकुळे हे मावळमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. बावनकुळे म्हणाले, बीड प्रकरणात सरकारने पुढाकार घेतला आहे. हे सरकार कारवाई करत आहे. अनेक जणांच्या चौकशी लावल्या आहेत. या प्रकरणांमध्ये देवेंद्र फडणवीस हे स्वतः लक्ष घालून आहेत. शेवटपर्यंत लक्ष देतील आणि आरोपींना शिक्षा भेटेल असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. पुढे ते म्हणाले, वाल्मिक कराडने चांगलं काम केलं म्हणूनच त्यांना लाडकी बहीण पदाचा अध्यक्ष पद दिलं असेल असे सूतोवाच देखील त्यांनी केले आहेत.

## केसगळतीचा फैलाव ११ गावांत; रुग्णसंख्या शंभरी पार

### महिलांचेही केस गळू लागल्याने त्यांच्यात भीती वाढली

। बुलढाणा । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अवघ्या तीन-चार दिवसांत अचानक केसगळतीला सुरुवात होऊन टक्कल पडण्याचा संसर्ग गुरुवारी अकरा गावांपर्यंत पसरला. पाच गावांची नव्याने भर पडल्याने या संगर्साचे रुग्ण आता शंभरावर पोहचले आहेत.**



दिवसागणिक रुग्णसंख्या वाढू लागल्याने आरोग्य यंत्रणा हादरली आहे. ही सर्व गावे खारपाणपट्ट्यातील असल्याने या गावांमध्ये ‘नायट्रेट’, ‘डीटीएस’चे प्रमाण अधिक आहे. पाण्यामुळे हे घडत असल्याचाही धोका व्यक्त झाल्याने पाण्याचे नमुने ‘हेवी मेटल्स’च्या तपासणीसाठी नागपूरला पाठविण्यात आले आहेत. पाच रुग्णांच्या नमुन्यांची ‘स्कीन बायोप्सी’ही केली जाणार आहे. या दोन्हींचे अहवाल आठ-दहा दिवसांनी येणार असल्याने केसगळतीच्या निदानासाठी आणखी काही दिवस गावकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.शेगाव तालुक्यातील बोंडगाव, कालवड, कठोरा, भोनगाव, हिंगणा, घुई या सहा गावांमध्ये आठ वर्षांच्या लहान मुला-मुलींपासून महिला व पुरुष अशा ५२ जणांना केसगळतीची समस्या असल्याचे दिसले. ७० ते ८० टक्के केस आपसूकच गळाल्याने लोकांनी टक्कल केले. आरोग्य यंत्रणेचे ५० अधिकारी, डॉक्टर व कर्मचारी केसगळती झालेल्या गावांमध्ये ७ जानेवारी रोजी पोहोचले. त्वचा रोगतज्ज्ञ डॉ. बालाजी आदरट यांनी रुग्णांची तपासणी करून ‘फंगल इन्फेक्शन’चा प्राथमिक अंदाज वर्तविला. आरोग्य पथकांकडून घरोघरी जाऊन सर्वेक्षण केले जात आहे. हे सारे घडत असतानाच गुरुवारी तरोडा कसबा, पहुरजिरा, निंबी, माटरगाव व मच्छिंद्रखेड या गावांमध्येही केसगळतीचे रुग्ण आढळले.

### महिलांमध्ये धास्ती

महिलांसाठी केस हे त्यांच्या सौंदर्याचा एक भाग आहे. या महिलांचेही केस गळू लागल्याने त्यांच्यात भीती वाढली आहे. अनेक महिला धास्तीपोटी समोरही येत नसल्याचे दिसून येत आहे. या महिलांवर उपचारासाठी समुपदेशन करण्याची गरज आहे. ग्रामपंचायतींमार्फत या महिलाचे समुपदेशन केले जात आहे. घरोघरी प्रत्यक्ष जावून, सोशल मीडियाच्या माध्यमातूनही जनजागृती केली जात आहे.

# बिल्डरने जमीन हडपली!

## मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर आत्मदहन करण्याचा पुण्यातील कुटुंबाचा निर्णय

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोंढवा येथील कापरे कुटुंबीयांची वडिलोपार्जित जमीन बिल्डरने हडपली असून त्या कुटुंबीयांना त्रास दिला जात आहे. सरकारकडून न्यायाची अपेक्षा व्यक्त करत या कुटुंबाने मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर आत्मदहन करणार असल्याचं म्हटलं आहे.**





पुण्यातील कोंढवा परिसरात राहणाऱ्या कापरे कुटुंबीयांची वडिलोपार्जित जमीन हडपण्याचा प्रयत्न दोन नामांकित बिल्डर करत आहेत. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित असतानाही, या दोन बिल्डरांनी जबरदस्तीने ताबा घेण्याचा प्रयत्न केला. डिसेंबर २१ रोजी बिल्डरने गुंड पाठवून ताबा घेण्याचा प्रयत्न केला, आणि आजही तिथेच ठाण मांडून बसले आहेत. या विरोधात कापरे कुटुंबीयांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन केले, परंतु पोलीस प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्यामुळे, आता थेट मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला आहे. बिल्डर आणि त्यांच्या गुंडांकडून होणाऱ्या सततच्या त्रासामुळे हा निर्णय घेतल्याचे कुटुंबीयांनी सांगितले आहे.

### नेमकं काय आहे प्रकरण?

अक्षय सुभाष कापरे यांच्या कोंढवा येथील सर्व्हे क्रमांक ३१ आणि सर्व्हे क्रमांक ३२ या ठिकाणी ३ ते ४ गुंठे जमीन आहे. या जमिनीवर नामांकित बिल्डर सुरेंद्र अगरवाल आणि सुजय श्रेणिक शहा यांनी जबरदस्तीने घुसखोरी करून ताबा घेतला आहे. याविरुद्ध कापरे कुटुंबीयांनी पुण्यात आंदोलन केले होते. जमिनीचा हा वाद २०१४ पासून सुरू आहे. या प्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल आहे; मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. त्यामुळे आता कापरे कुटुंबीयांनी मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर आत्मदहन करण्याचा निर्णय घेतला आहे.

### बिल्डर 2013 पासून त्रास देत आहे

तथापि, शहा आणि अगरवाल बिल्डर २०१३ पासून आम्हाला त्रास देत आहेत. आमच्या जमिनीवरची शासकीय चंदनाची झाडेसुद्धा त्यांनी कापली आहेत. या संदर्भात आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन केले. तक्रार दाखल करूनही, आमच्या जागेवर गुंडांनी बेकायदेशीर ताबा घेतला आहे. आम्हाला या सरकारकडून न्यायाची अपेक्षा आहे. म्हणून आम्ही सर्व कुटुंबीय मुख्यमंत्र्यांच्या घरासमोर रॉकेल ओतून आत्मदहन करणार आहोत.” दरम्यान, या संदर्भात अगरवाल आणि शहा बिल्डर्सची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र कोणत्याही मार्गाने त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

### कापरे कुटुंबीयांची प्रतिक्रिया -

“कोंढवा येथे आमच्या जमिनीवर ताबा घेण्याचा प्रयत्न गेली अनेक वर्षे सुरू आहे. बिल्डरांनी खोटे कागदपत्र तयार करून कोर्टात पुरावे सादर केले. सत्र न्यायालयात निकाल आमच्या बाजूने लागला, पण उच्च न्यायालयात निकाल आमच्या विरोधात गेला. त्यामुळे आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे.


---

# उद्योगांमध्ये पुण्याचे पाऊल पडते पुढे...!

## कार्यालयीन जागा घेणाऱ्यांमध्ये तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांचा प्रामुख्याने समावेश

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात देश-विदेशातील कंपन्या कार्यालये सुरू करीत आहेत. यामुळे पुण्यातील कार्यालयीन जागांच्या बाजारपेठेतील तेजी कायम आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी कार्यालयीन जागांचे व्यवहार उच्चांकी पातळीवर पोहोचल्याचे समोर आले आहे.**



कार्यालयीन जागांची बाजारपेठ ही त्या शहरातील कंपन्यांचा विस्तार कसा होत आहे, हे दर्शविणारी असते. गेल्या वर्षी पुण्यात कार्यालयीन जागांचे ८० लाख चौरस फुटांचे व्यवहार झाले. आधीच्या वर्षाच्या तुलनेत गेल्या वर्षी या व्यवहारांमध्ये १९ टक्के वाढ नोंदविण्यात आली. गेल्या वर्षी पहिल्या सहामाहीत कार्यालयीन जागांना मोठी मागणी होती आणि दुसऱ्या सहामाहीत मागणीत फार वाढ झाली नाही. परंतु, ती स्थिर राहिल्याचे चित्र नाइट फ्रँक इंडियाच्या ताज्या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

कार्यालयीन जागा घेणाऱ्यांमध्ये देशातील तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या आणि जागतिक पातळीवरील कंपन्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. देशातील तंत्रज्ञान कंपन्यांसोबत बहुराष्ट्रीय कंपन्यांना जागतिक सुविधा केंद्रांसाठी पुणे आकर्षक ठिकाण ठरत आहे. त्यातही मोक्याच्या ठिकाणी कार्यालयीन जागा घेण्यास कंपन्या पसंती देत आहेत. त्यात खराडीचा प्रामुख्याने समावेश आहे. गेल्या वर्षी कार्यालयीन जागांमध्ये ५७ लाख चौरस फुटांच्या नवीन जागांची भर पडली. गेल्या वर्षी नवीन जागांच्या पुरवठ्यात ५८ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. यामुळे कार्यालयीन जागांचा पुरवठा मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून आला आहे. पुण्यात कार्यालयीन भाड्यात गेल्या वर्षी ५ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. मासिक सरासरी भाडेदर प्रतिचौरस फूट ७७ रुपये आहे. करोना संकटापूर्वीची पातळी भाड्याने आता ओलांडलेली आहे.

को-वर्किंग स्पेस म्हणजेच कार्यालयीन जागा सहकार्याला पुण्यात दिवसेंदिवस पसंती वाढत आहे. गेल्या वर्षी झालेल्या एकूण कार्यालयीन जागा व्यवहारांपैकी ३५ टक्के व्यवहार कार्यालयीन जागा सहकार्याचे आहेत. यामुळे कार्यालयीन जागा सहकार्यातील वाढीत कार्यालयीन जागा सहकार्याचा मोठा वाटा आहे. पुण्यात नवउद्यमी परिसंस्थेचा याला सर्वाधिक हातभार लागत आहे. अनेक कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना घरून कामासोबत कार्यालयात येऊन काम करण्याची संमिश्र पद्धत लागू केली आहे. त्यामुळे कार्यालयीन जागा सहकार्याला मागणी वाढली आहे. गेल्या वर्षी कार्यालयीन जागा सहकार्याचे २८ लाख चौरस फुटांचे व्यवहार झाले. त्याआधी २०२३ मध्ये १३ लाख चौरस फुटांचे व्यवहार झाले होते. गेल्या वर्षी त्यात तब्बल ११२ टक्के वाढ नोंदविण्यात आली.

### कंपन्यांमुळे नोकरीच्या संधी

कार्यालयीन जागा व्यवहारांतून पुण्याचे महत्त्वाचे स्थान अधोरेखित झाले आहे. देशातील प्रमुख महानगरांचा विचार करता पुण्याचे सहावे स्थान आहे. त्यात बंगळुरू १.८१ कोटी चौरस फुटांसह आघाडीवर आहे. दिल्ली १.२७ कोटी चौरस फुटांसह दुसऱ्या स्थानी आणि मुंबई १.०४ कोटी चौरस फुटांसह तिसऱ्या स्थानी आहे. कार्यालयीन जागा व्यवहारात पुण्याची वेगाने घोडदौड सुरू आहे. पुण्यात येणाऱ्या कंपन्यांमुळे नोकरीच्या संधी निर्माण होण्यासोबत पुण्याच्या अर्थकारणाला गती मिळत आहे. यामुळे पुण्याचे पाऊल गेल्या वर्षी पुढे पडले आहे.

## राज्यात कायदा व सुव्यवस्था ढासळल्याच्या निषेधार्थ

# पिंपरी-चिंचवड तहसीलदार कार्यालयासमोर जनआक्रोश !

### आवाज दिला लेकीने, समाज आला लाखाने..., आंदोलकांनी दिल्या विविध घोषणा



। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात कायदा व सुव्यवस्था ढासळलेली दिसून येत आहे. गुंडगिरी, बलात्कार, खून, दरोडे, धमकावणे, खंडणीचे प्रमाण वाढले आहे. राजकीय वरदहस्तामुळे जिल्ह्या-जिल्ह्यांत गुंडांच्या टोळ्या तयार झाल्या आहेत. त्याच्या निषेधार्थ निगडीतील पिंपरी-चिंचवड तहसीलदार कार्यालयासमोर गुरुवार (ता.९) रोजी जनआक्रोश धरणे आंदोलन करण्यात आले. 'आवाज दिला लेकीने, समाज आला लाखाने', यासारख्या विविध घोषणा आंदोलकांनी दिल्या.**



यावेळी नागरी हक्क कृती समितीचे मानव कांबळे, प्रकाश जाधव, संजोग पाटील, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, माजी नगरसेवक मारूती भापकर, नरेंद्र बनसोडे, शिवशंकर उबाळे, सोमनाथ शेळके, मीना जावळे, प्रताप गुरव, शामराव वीटकर, सुनिता शिंदे, कल्पना गिडडे, शैलजा चौधरी, अजय भोसले, बापू गायकवाड, राजन नायर यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. यावेळी संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे, मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे, प्रदीप पवार, अरुण पवार, विश्वनाथ जगताप, गणेश देवराम, विशाल मिठे, विष्णू मांजरे, जयंत गायकवाड, नकुल भोईर, संजय जाधव, शहाजी कारकर, शशिकांत औटी, महेश कांबळे, रवींद्र चव्हाण, शांताराम खुडे, संतोषराजे निंबाळकर, संपतराव जगताप, वसंत पाटील इत्यादी मान्यवरांसह अनेक आंदोलक उपस्थित होते. जीवन बोराडे यांनी आभार मानले. यावेळी आंदोलकांकडून विविध मागण्यांचे निवेदन तहसिलदार जयराज देशमुख यांच्याकडे देण्यात आले.

### मागण्या काय होत्या

- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील सर्व आरोपींना अटक करावी
- देशमुख कुटुंबीय व घटनेचे साक्षीदार यांना पोलिस संरक्षण द्यावे
- न्यायालयातून आरोपींना लवकरात लवकर फाशी दिली जावी
- आरोपींच्या संपत्तीची ईडीमार्फत चौकशी करावी
- परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी
- राजगुरूनगरमधील लैगिक अत्याचारातील आरोपींवर कडक कायदेशीर कारवाई करावी

### लक्षवेधक फलक, बॅनर...

आंदोलकांच्या विविध घोषणा आणि फ्लेक्स, बॅनरद्वारे सर्व लोकांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यामध्ये आरोपी वाल्मीक कराडला फाशी झालीच पाहिजे, 'आवाज दिला लेकीने, समाज आला लाखाने', 'सरकार हा असंतोष पहा, न्याय द्या', 'संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्याला संरक्षण देणाऱ्याला बरखास्त करा, अशा अनेक घोषणा आंदोलकांनी दिल्या.

---

## क्रीडा सुविधांकडे प्रशासनाचा 'कानाडोळा'

### मासुळकर कॉलनीतील दुरवस्था; भाजपा आमदार महेश लांडगे यांनी अधिकाऱ्यांचे कान टोचले

। जुनी सांगवी । प्रतिनिधी : महाईन्यूज


**पिंपरी- चिंचवड : अजमेरा मासुळकर कॉलनी येथील डॉ. हेडगेवार मैदान आणि परिसरातील क्रीडा संकुलांमध्ये विद्युतपुरवठा खंडीत झाला होता. तसेच, स्वच्छता गृहाची दुरावस्ता झाली होती. याबाबत भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी महानगरपालिका संबंधित विभागाचे अधिकारी आणि महावितरण अधिकाऱ्यांना चांगलेच खडसावले. तसेच, सदर सुविधा तात्काळ पूर्णवत करण्याची सूचना केली आहे.**




अजमेरा मासुळकर कॉलनी येथील पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या डॉ. हेडगेवार मैदान, स्केटिंग ग्राउंड, व्यायामशाळा, बॅडमिंटन हॉल या ठिकाणी गेल्या १५ दिवसांपासून विद्युत पुरवठा खंडीत झाला असून, स्वच्छतागृहाची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे परिसरातील ज्येष्ठ नागरिक, खेळाडू, व्यायामास येणारी मुले यांची गैरसोय होत आहे. याच्या निषेधार्थ आज आंदोलन करण्यात आले. यावेळी आमदार महेश लांडगे, अर्जुन ठाकरे, फारुक इनामदार, संजय साळुंखे, तुषार वाघिरे, वैशाली खाडे, संजय मगोडेकर, मोहन पवार, भावेन पाठक, विजय पवार, बबलू सय्यद, किरण पवार, मंगेश कुलकर्णी, माधुरी घोरपडे, माणिकराव अहिराव, हेमंत शिर्के, गणेश जाधव उपस्थित होते.

> अजमेरा मासुळकर कॉलनी परिसरातील सर्वसामान्य नागरिक आणि खेळाडुंच्या डॉ. हेडगेवार मैदान आणि या ठिकाणच्या क्रीडा संकुलांमध्ये पायाभूत सोयी-सुविधांबाबत अनेक तक्रारी आहेत. त्यामुळे आंदोलनस्थळी भेट दिली. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याशी संपर्क केला आणि तात्काळ कार्यवाही करण्याची सूचना केली. यावर आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना तसे आदेश दिले आहेत. सर्वसामान्य नागरिकांना सक्षमपणे पायाभूत सोयी-सुविधा मिळाल्या पाहिजेत, यासाठी आम्ही प्राधान्याने काम करीत आहोत.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नाम व विकल्प !

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही, अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे, नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून, विकल्पांच्या उच्चाटनाची गुरुकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा, हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरुवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले चालणे चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तरी आपण आपले नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील. बोधवचन:- पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती निःशंक होतेच होते.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# पाडापाडीची राजनीती, नितीशची कपटनीती!

**पाडापाडीचे राजकारण करण्यात बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार पारंगत आहेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून बिहारचे ज्येष्ठ नेते दादू प्रसाद यांच्यापर्यंत सर्वांनाच ठाऊक आहे. तसं पाहिलं तर नितीश यांच्याकडे सध्या राष्ट्रीय पातळीवर कोणताच पर्याय दिसत नाही. पण, कटकारस्थाने किंवा राजकीय डावपेच टाकण्यात ते पटाईत आहेत. त्यांच्या राजकीय आडाख्यांचा अंदाज कोणालाही येत नाही.**

आता गेल्याच आठवड्यात बिहारचे राज्यपाल म्हणून आरीफ महंमद खान यांची नियुक्ती झाली. मुख्यमंत्री असल्यामुळे अर्थातच नितीशकुमार यांना ती खटकली ! एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की नवे राज्यपाल आणण्यामागे केंद्र सरकारची व्यूहरचना आहे. बिहार मध्ये नितीशकुमार काही डावपेच करणार, हे अनपेक्षित नाही. फक्त ते बारा खासदारांच्या बळावर केंद्र सरकारला काही धक्का लावू शकतील, असे सध्या तरी वाटत नाही. त्यांची पोहोच किंवा उडी सध्या फार तर बिहारमध्ये आपली खुर्ची पक्की करण्याची असू शकते. ते काँग्रेसच्या मागे फरपटत जातील, असे मात्र सध्या दिसत नाही.



## राज्यपाल बदलण्याचे धोरण

बिहार प्रमाणे अन्य पाच राज्यांचे राज्यपाल देखील बदलले आहेत. पूर्वेकडील आणि पूर्वोत्तर राज्यांमध्ये सध्या जे आव्हान आहे, ते प्रामुख्याने बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोर यांचे आहे. मणिपूर, मिझोराम येथे असेच स्थानिक प्रश्न आहेत.

## केंद्र सरकारला राज्यांची साथ हवी

बांगलादेशात कट्टरपंथी सत्ताधारी झाले आहेत आणि त्याचा परिणाम अनेक राज्यांमध्ये होऊ शकतो. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे एकत्रितपणे हे आव्हान मोडून काढू शकतात. त्याचाच एक भाग म्हणजे दिल्लीत रोहिंग्यांचा शोध घेऊन त्यांना बाहेर काढले जात आहे. महाराष्ट्रात देखील पकडले जाणारे रोहिंग्या छावणीत ठेवले जातील आणि त्यांना परत पाठवले जातील. झारखंड आणि बिहार या दोनही राज्यांमध्ये घुसखोरी आणि त्यातून निर्माण होणारे भौगोलिक आणि सामाजिक प्रश्न लक्षात घेतले तर केंद्र सरकारची भूमिका लक्षात घ्यायला हवी.

## नितीशकुमार यांचा मनसुबा

नितीशकुमार यांना विरोधी पक्षांचे किंवा 'इंडी' आघाडीचे एकमुखी नेते म्हणून मिरवण्याची हौस आहेच. त्यांना पंतप्रधान व्हायचे आहे, असे नव्हे, पण एक राष्ट्रीय नेता म्हणून आपली नोंद घेतली जावी, ही उघड इच्छा त्यांना आहे, हे जगजाहीर आहे. म्हणूनच आता भाजपच्या पाठिंब्यावर आणखी बरीच वर्षे मुख्यमंत्री म्हणून काम करणे अशक्य नाही, पण, आता मिळवायचे काही नाही. शिवाय त्यांची प्रतिमा इतरांच्या तुलनेने बरीच चांगली आहे. कदाचित जयप्रकाश नारायण होऊन सत्ताधारी पक्षाच्या विरोधात रणकंदन माजविणे, हेही मनात कुठेतरी शिजत आहे. त्यांना उपराष्ट्रपती करण्याची भाजपची तयारी आहे, असे म्हटले जाते पण त्यात फारसे तथ्य नसावे.

## मनात नेमकं दडलंय काय?

बिहार विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका जाहीर करण्याचे देखील त्यांच्या मनात असू शकते. लालू यादव त्यांना पाठिंबा देण्यासाठी कायम तयारच आहेत. नितीशकुमार यांच्या या डावपेचात कदाचित राज्यपाल आरीफ महंमद खान यांचा अडथळा उभा राहू शकतो. तो म्हणजे रातोरात नितीशकुमार यांनी आपले नाव पलटूराम हे सिद्ध केले तर नव्या सरकारला शपथ देण्याऐवजी राष्ट्रपती राजवट लागू शकते, हे कोणालाही समजेल. या पार्श्वभूमीवर आता महत्त्वाचे म्हणजे नितीशकुमार यांच्या पक्षाची विधानसभा आणि लोकसभेत ताकद बरीच कमी झाली आहे. भाजप त्यांनाच पुन्हा मुख्यमंत्री करण्यास तयार असला तरीही पक्षाची प्रदेश शाखा आता एकला चलो, किंवा आता नितीशकुमार पुरे झाले, अशी आहे. याशिवाय पासवान, जितनराम मांझी यांना त्यांचे पक्ष वाढवायचे आहेत. भाजपची तयारी त्या दिशेने सुरु आहे.

## भाजपाचे पारडे वरचढ

केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपसाठी एक सकारात्मक बाब म्हणजे नितीशकुमार यांनी काही डाव टाकला,तरी लगेचच काही परिणाम होईल असे नाही. त्यांचे बारा खासदार आहेत. त्यातील आठ फुटू शकतात. शिवाय महाराष्ट्र आणि हरियाणात झालेल्या विजयामुळे भाजपकडे अनेक खासदारांनचा ओढा आहे. महाराष्ट्रात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे मिळून 17 खासदार आहेत, हे सर्वांना माहीत आहे. काँग्रेस पक्षातील तीसचाळीस खासदार फोडून तेथे पोटनिवडणुका घेणे सहज शक्य आहे. नितीशकुमार यांनी काही धाडस केले, तर इंडी आघाडी त्यांच्या पाठीशी जाऊ शकते, पण त्यामुळे काँग्रेस आपोआपच कमकुवत होईल. नाहीतरी काँग्रेसचे नेतृत्व इंडी आघाडी च्या घटक पक्षांना नकोसे झालेच आहे, ते वेळोवेळी सिद्धही झाले आहे. नितीशकुमार यांनी सध्याच्या परिस्थितीत काहीही हालचाल केली तर ती मोडीत काढण्याची ताकद भारतीय जनता पार्टीमध्ये नक्की आहे. पण, उचापती करणार नाहीत तर ते नितीशकुमार कसले? ते स्वस्त बसणार नाहीत आणि भाजपाला स्वस्तही बसू देणार नाहीत अशी अवस्था मात्र सध्या राजकारणात दिसत आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# विधानसभा तो झांकी है; पालिका बाकी है!

## सरडाही रंग बदलतो पण अशा प्रकारची नवी जात

**। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट मागच्या महिन्यात उद्धव ठाकरेंनी घेतली होती. तसंच आदित्य ठाकरे हेदेएखील तिसऱ्यांदा देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला पोहचले होते. सामनातून देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक करण्यात आलं होतं. या सगळ्या बाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना प्रश्न विचारला असता त्यांनी नाव न घेता उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. महाविकास आघाडीला जनतेने धडा शिकवला असंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.**





विधानसभा तो झांकी है, महापालिका बाकी है. पिक्चर अभी बाकी है. असं म्हणत नाव न घेता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. ज्यांनी ज्यांनी बाळासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा केली, हिंदुत्वाच्या विचारांशी प्रतारणा केली, स्वतःच्या स्वार्थासाठी सगळ्या गोष्टी केल्या त्यांना लोकांनी धडा शिकवला. महाराष्ट्रातून जनतेचा ओघ शिवसेनेत येतो आहे ही याची पोचपावती आहे. असंही एकनाथ शिंदे म्हणाले.“घटनाबाह्य सरकार, घटनाबाह्य मुख्यमंत्री असं काही लोक मला म्हणत होते. तसंच देवेंद्र फडणवीस यांना फडतूस म्हणणारे, देवेंद्र फडणवीस यांना तू राहशील किंवा मी राहिन म्हणणारे एवढ्या लवकर रंग बदलतील असं वाटलं नव्हतं. सरडाही रंग बदलतो पण अशा प्रकारची नवी जात आताच पाहिली. ज्यांना लोकांनी झिडकारलं, बाळासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्यांना लोकांनी जागा दाखवून दिली. जनतेने त्यांचा कचरा केला. त्यामुळे कुठेतरी आता तुम लढो हम कपडा संभालते हैं सारखं तुम लढो हम बुके देकर आते है असं चाललं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कुणीही भेटू शकतं. सामान्य माणूस असो किंवा कुठल्या पक्षाचा नेता असो तो भेटू शकतो. मलाही अनेक लोक भेटायचे”, असंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, “देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत. त्यांना कुणीही भेटू शकतं. अत्यंत टोकाचा मत्सर, द्वेष आणि फडणवीस यांना तुरुंगात टाकण्याचं कारस्थान करणाऱ्या लोकांना इतक्या लवकर उपरती सुचली ही चांगली गोष्ट आहे. असाही टोला एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना लगावला. संस्कृती, संस्कार हे महाविकास आघाडीला महाराष्ट्राच्या जनतेने दाखवलं. कारण मविआ शिव्या-शाप आणि आरोप एवढंच करत होते. मात्र आम्ही महाराष्ट्राची संस्कृती आणि संस्कार जपले. आम्ही आरोपांना उत्तर दिलं नाही. कामांमधून उत्तर दिलं. त्यामुळे जनतेने त्यांना विधानसभेच्या निवडणुकीत संस्कार आणि संस्कृती शिकवली” असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.विधानसभा तो झांकी है, महापालिका बाकी है. पिक्चर अभी बाकी है. असं म्हणत नाव न घेता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे. ज्यांनी ज्यांनी बाळासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा केली, हिंदुत्वाच्या विचारांशी प्रतारणा केली, स्वतःच्या स्वार्थासाठी सगळ्या गोष्टी केल्या त्यांना लोकांनी धडा शिकवला. महाराष्ट्रातून जनतेचा ओघ शिवसेनेत येतो आहे ही याची पोचपावती आहे. असंही एकनाथ शिंदे म्हणाले.“घटनाबाह्य सरकार, घटनाबाह्य मुख्यमंत्री असं काही लोक मला म्हणत होते. तसंच देवेंद्र फडणवीस यांना फडतूस म्हणणारे, देवेंद्र फडणवीस यांना तू राहशील किंवा मी राहिन म्हणणारे एवढ्या लवकर रंग बदलतील असं वाटलं नव्हतं. सरडाही रंग बदलतो पण अशा प्रकारची नवी जात आताच पाहिली. ज्यांना लोकांनी झिडकारलं, बाळासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्यांना लोकांनी जागा दाखवून दिली. जनतेने त्यांचा कचरा केला. त्यामुळे कुठेतरी आता तुम लढो हम कपडा संभालते हैं सारखं तुम लढो हम बुके देकर आते है असं चाललं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कुणीही भेटू शकतं. सामान्य माणूस असो किंवा कुठल्या पक्षाचा नेता असो तो भेटू शकतो. मलाही अनेक लोक भेटायचे”, असंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, “देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत.

### तुरुंगात टाकण्याचं कारस्थान

अत्यंत टोकाचा मत्सर, द्वेष आणि फडणवीस यांना तुरुंगात टाकण्याचं कारस्थान करणाऱ्या लोकांना इतक्या लवकर उपरती सुचली ही चांगली गोष्ट आहे. असाही टोला एकनाथ शिंदेंनी उद्धव ठाकरेंना लगावला. संस्कृती, संस्कार हे महाविकास आघाडीला महाराष्ट्राच्या जनतेने दाखवलं. कारण मविआ शिव्या-शाप आणि आरोप एवढंच करत होते. मात्र आम्ही महाराष्ट्राची संस्कृती आणि संस्कार जपले. आम्ही आरोपांना उत्तर दिलं नाही. कामांमधून उत्तर दिलं. त्यामुळे जनतेने त्यांना विधानसभेच्या निवडणुकीत संस्कार आणि संस्कृती शिकवली” असंही एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट मागच्या महिन्यात उद्धव ठाकरेंनी घेतली होती. तसंच आदित्य ठाकरे हेदेएखील तिसऱ्यांदा देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला पोहचले होते. सामनातून देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक करण्यात आलं होतं. या सगळ्या बाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना प्रश्न विचारला असता त्यांनी नाव न घेता उद्धव ठाकरेंना टोला लगावला आहे. महाविकास आघाडीला जनतेने धडा शिकवला असंही एकनाथ शिंदेंनी म्हटलं आहे.

# पवारांच्या खासदारांना ऑफर दिली का?

## खासदारांना आम्ही कुठलीही ऑफर दिलेली नाही : निलेश लंके

**। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार सत्तेत आलं, तर या निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठं अपयश आलं. काही दिवसांपूर्वी शरद पवार आणि अजित पवार एकत्र येतील अशा चर्चा सुरु झाल्या होत्या, मात्र, असं असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदारांना संपर्क करण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.**





याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भूमिका मांडली आहे.२०२३ मध्ये शरद पवारांना सोडून अजित पवार यांनी महायुतीच्या सरकारमध्ये जाणं पसंत केलं. त्यांच्याबरोबर राष्ट्रवादीचे ४१ आमदारही सत्तेत गेले. २०२३ पासून अजित पवार विरुद्ध शरद पवार असा संघर्ष राज्याला दिसला. जून २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत बारामतीची चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली. अजित पवारांनी महायुतीकडून सुनेत्रा पवारांना उमेदवारी दिली होती. तर महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे होत्या.लोकसभेला सुप्रिया सुळे निवडून आल्या. तसंच शरद पवारांच्या पक्षानेही उत्तम कामगिरी केली. तर विधानसभेला याच्या विरुद्ध चित्र दिसलं. विधानसभा निवडणुकीत अजित पवारांना आणि त्यांच्या पक्षाला ४१ जागा मिळाल्या. तर महायुतीला २३७ जागा मिळाल्या. यानंतर अजित पवारांच्या पक्षाने शरद पवारांच्या पक्षातील खासदारांना बरोबर येण्याची ऑफर दिल्याच्या चर्चा होत्या. त्यावर अजित पवारांनी उत्तर दिलं आहे.

### अजित पवार नेमकं काय म्हणाले?

आमदार रोहित पवार यांनी देखील प्रतिक्रिया देत सूचक भाष्य केलं आहे. “संसदेचं अधिवेशन सुरु होतं, तेव्हा सुनील तटकरे यांनी आमच्या खासदारांशी संपर्क केल्याची चर्चा आहे. पण आमचे खासदार असा कोणताही निर्णय घेतील असं आपल्याला वाटत नाही”, असं रोहित पवारांनी म्हटलं आहे.राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या खासदारांना आम्ही कुठलीही ऑफर दिलेली नाही. निलेश लंके, अमर काळे यांच्यासह तीन-चार जणांनी सांगितलं की सुनील तटकरे यांच्यासह कुणीही आम्हाला संपर्क केलेला नाही. मग या चर्चा का घडवता? असा प्रश्न विचारत अजित पवार यांनी कुणालाही कुठलीही ऑफर दिलेली नाही.

# स्टील कारखान्यात चिमणी कोसळली!

## 9 जणांचा मृत्यू ; 30 हून अधिक मजूर अडकले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**छत्तीसगडच्या मुंगेली जिल्ह्यात मोठी दुर्घटना घडली आहे. इथल्या स्टिल कारखान्यातील निर्माणाधीन चिमणी कोसळली. निर्माणाधीन चिमणी कोसळल्यानं 30 पेक्षा जास्त जण खाली दबले गेले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या 9 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आलेली आहे.**



सरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या रामबोड परिसरात कुसुम फॅक्ट्रीमध्ये चिमणी उभारण्याचं काम सुरु होतं. मजूर काम करत असताना कारखान्यातील चिमणी अचानक कोसळली. चिमणी कोसळताच तिकडे काम करत असलेले जवळपास 30 मजूर खाली अडकले. चिमणी कोसळल्यानं कारखान्यात एकच गोंधळ उडाला. कारखान्यातील चिमणी मजुरांवर कोसळताच एकच आक्रोश सुरु झाला. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मजुरांची जीव वाचवण्यासाठी धडपड सुरु झाली. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी राहुल देव पोहोचले. त्यांच्याकडून घटनास्थळाचा आढावा घेतला जात आहे. मजुरांच्या सुटकेसाठी हरतऱ्हेचे प्रयत्न सुरु असल्याची देव यांनी सांगितलं. दरम्यान उपलब्ध माहितीनुसार या दुर्घटनेत 9 कामगारांचा मृत्यू झाला आहे. हा आकडा वाढण्याची शक्यता देखील आहे. तर 25 पेक्षा जास्त कामगार जखमी झाले आहेत. ही दुर्घटना सरगाव येथील रामबोड या भागात घडली आहे. प्रशासन स्थानिक लोकांच्या मदतीने बचावकार्य करत आहे. ही दुर्घटना लोखंडी पाईप बनवण्याच्या कारखान्याचे बांधकाम सुरू असताना घडली आहे. जवळपास 30 मजूर ढिगाऱ्याखाली अडकले. त्यांच्या मदतीसाठी बचाव कार्य सुरु करण्यात आलं आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन कारखान्यात पोहोचलं. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मजुरांच्या सुटकेचे प्रयत्न सुरु आहेत. आतापर्यंत 9 मजुरांचा मृत्यू झाला आहे.सरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या रामबोड परिसरात कुसुम फॅक्ट्रीमध्ये चिमणी उभारण्याचं काम सुरु होतं. मजूर काम करत असताना कारखान्यातील चिमणी अचानक कोसळली. चिमणी कोसळताच तिकडे काम करत असलेले जवळपास 30 मजूर खाली अडकले. चिमणी कोसळल्यानं कारखान्यात एकच गोंधळ उडाला. कारखान्यातील चिमणी मजुरांवर कोसळताच एकच आक्रोश सुरु झाला. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मजुरांची जीव वाचवण्यासाठी धडपड सुरु झाली. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी राहुल देव पोहोचले. त्यांच्याकडून घटनास्थळाचा आढावा घेतला जात आहे. मजुरांच्या सुटकेसाठी हरतऱ्हेचे प्रयत्न सुरु असल्याची देव यांनी सांगितलं. दरम्यान उपलब्ध माहितीनुसार या दुर्घटनेत 9 कामगारांचा मृत्यू झाला आहे. हा आकडा वाढण्याची शक्यता देखील आहे. तर 25 पेक्षा जास्त कामगार जखमी झाले आहेत. ही दुर्घटना सरगाव येथील रामबोड या भागात घडली आहे. प्रशासन स्थानिक लोकांच्या मदतीने बचावकार्य करत आहे. ही दुर्घटना लोखंडी पाईप बनवण्याच्या कारखान्याचे बांधकाम सुरू असताना घडली आहे. जवळपास 30 मजूर ढिगाऱ्याखाली अडकले. त्यांच्या मदतीसाठी बचाव कार्य सुरु करण्यात आलं आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन कारखान्यात पोहोचलं. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मजुरांच्या सुटकेचे प्रयत्न सुरु आहेत. आतापर्यंत 9 मजुरांचा मृत्यू झाला आहे.छत्तीसगडच्या मुंगेली जिल्ह्यात मोठी दुर्घटना घडली आहे. इथल्या स्टिल कारखान्यातील निर्माणाधीन चिमणी कोसळली. निर्माणाधीन चिमणी कोसळल्यानं 30 पेक्षा जास्त जण खाली दबले गेले. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या 9 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आलेली आहे.

### मदतीसाठी बचाव कार्य सुरु

सरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या रामबोड परिसरात कुसुम फॅक्ट्रीमध्ये चिमणी उभारण्याचं काम सुरु होतं. मजूर काम करत असताना कारखान्यातील चिमणी अचानक कोसळली. चिमणी कोसळताच तिकडे काम करत असलेले जवळपास 30 मजूर खाली अडकले. चिमणी कोसळल्यानं कारखान्यात एकच गोंधळ उडाला. कारखान्यातील चिमणी मजुरांवर कोसळताच एकच आक्रोश सुरु झाला. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मजुरांची जीव वाचवण्यासाठी धडपड सुरु झाली. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी राहुल देव पोहोचले. त्यांच्याकडून घटनास्थळाचा आढावा घेतला जात आहे. मजुरांच्या सुटकेसाठी हरतऱ्हेचे प्रयत्न सुरु असल्याची देव यांनी सांगितलं. दरम्यान उपलब्ध माहितीनुसार या दुर्घटनेत 9 कामगारांचा मृत्यू झाला आहे. हा आकडा वाढण्याची शक्यता देखील आहे. तर 25 पेक्षा जास्त कामगार जखमी झाले आहेत. ही दुर्घटना सरगाव येथील रामबोड या भागात घडली आहे. प्रशासन स्थानिक लोकांच्या मदतीने बचावकार्य करत आहे. ही दुर्घटना लोखंडी पाईप बनवण्याच्या कारखान्याचे बांधकाम सुरू असताना घडली आहे.

# सिंगापूरचा पासपोर्ट पुन्हा सगळ्यात पॉवरफुल

## हेन्ली पासपोर्ट इंडेक्स 2025 नुसार जगात भारताचा क्रमांक घसरला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगातील सर्वात शक्तिशाली पासपोर्टच्या क्रमवारीत भारताची ५ अंकांनी घसरण झाली आहे. हेन्ली पासपोर्ट इंडेक्स २०२५ नुसार भारताची रँकिंग ही ८५ व्या क्रमांकावरून ८० गेली आहे. हेन्ली पासपोर्ट इंडेक्समध्ये १९९ देशांच्या पासपोर्ट्सना ते व्हिसा शिवाय किती देशांना भेटी देऊ शकतात यानुसार ही रँकिंग दिली जाते.**




नुकतेच जाहीर करण्यात आलेल्या या रँकिंगनुसार, भारतीय पासपोर्ट असणारे प्रवासी ५७ देशांना व्हिसाशिवाय भेट देऊ शकतात. भारताबरोबर या क्रमांकावर इक्वेटोरीयल गिनी आणि नाजर हे देश देखील आहेत.सर्वात शक्तिशाली पासपोर्ट म्हणून या यादीत सिंगापूरचा दबदबा कायम राहिला आहे. सिंगापूरने २०२५च्या यादीत पहिले स्थान पटकवले आहे. हेन्ली पासपोर्ट इंडेक्सनुसार सिंगापूरचा पासपोर्ट असलेली व्यक्ती जगभरातील १९५ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करू शकते. त्यापाठोपाठ जपान (१९३ देश), फिनलँड (१९२ देश), फ्रान्स (१९२ देश), जर्मनी (१९२ देश), इटली (१९२ देश), दक्षिण कोरिया (१९२ देश), स्पेन (१९२ देश), ऑस्ट्रिया (१९२ देश) आणि डेन्मार्क (१९१ देश) यांचा क्रमांक लागतो. या निर्देशांकात यूएई (UAE) ने गेल्या दशकभरात सर्वात मोठी झेप घेतली आहे. २०१५ च्या तुलनेत यूएईचा पासपोर्ट असणाऱ्यांना अधिकच्या ७२ देशामध्ये व्हिसाशिवाय प्रवेश मिळतो. यूएई पासपोर्ट धारकांना जगभरातील १८५ देशांमध्ये व्हिसा फ्री प्रवेश मिळतो. यूएई या निर्देशांकात ३२ स्थानांची उडी घेत १०व्या क्रमांकावर पोहचला आहे. अमेरिकेची मात्र या निर्देशांकात घसरण झाल्याचे पाहायला मिळाले.

### तळाशी कोण आहे?

२०१५ आणि २०२५ दरम्यान यूएस दुसऱ्या स्थानावरून ९व्या स्थानावर घसरले आहे.२०२५ मध्ये, पाकिस्तान आणि येमेन हे दोन देश हेनली पासपोर्ट निर्देशांकात १०३ व्या स्थानावर आहेत , या दोन देशांचा पासपोर्ट असणाऱ्या नागरिकांना फक्त ३३ देशआंमध्ये व्हिसा शिवाय प्रवेश मिळतो. त्यानंतर इराक (३१ देश), सीरिया (२७ देश) आणि अफगाणिस्तान (२६ देश) यांचा क्रमांक लागतो. जगातील सर्वात शक्तिशाली पासपोर्टच्या क्रमवारीत भारताची ५ अंकांनी घसरण झाली आहे.

# कुटुंब आणि मित्रांसोबत गेट टुगेदर पार्टी!

परिणीती चोप्रा आणि आपचे खासदार राघव चड्ढा यांच्या लग्नाचे कार्यक्रम वेगवेगळ्या शहरात होणार आहेत. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, राघव-परिणितीच्या लग्नाचे कार्यक्रम 17 सप्टेंबर रोजी दिल्लीत अरदास आणि शब्द कीर्तन (शीख धर्माची प्रार्थना) सह सुरू होतील. यानंतर हे जोडपे लग्नासाठी उदयपूरला जाणार आहेत. यानंतर चंदीगडमध्ये रिसेप्शन पार्टी होणार आहे. चंदीगडनंतर हे कपल दिल्लीतही रिसेप्शन पार्टी देणार आहे. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, 17 सप्टेंबर रोजी दिल्लीत अरदास आणि शब्द कीर्तनानंतर गेट-टूगेदर पार्टी होणार आहे. राघव-परिणितीचे कुटुंबीय आणि जवळचे मित्र या पार्टीत सहभागी होणार आहेत. यानंतर दोघेही कुटुंबासह उदयपूरला जाणार आहेत. लग्नाच्या सर्व फंक्शन्समध्ये जोडप्याच्या कपड्यांप्रमाणेच पेस्टल आणि पर्ल व्हाइट थीमची सजावट पाहायला मिळेल. परिणीती आणि राघव यांना ही रंग आणि सजावटीची थीम आवडली आहे. लग्नातही हे जोडपे सारख्याच रंगाचे को-ऑर्डिनेटेड कपडे परिधान करताना दिसणार आहेत. रिपोर्टनुसार, परिणीतीने जवळपास सर्व फंक्शन्समध्ये कोणते कपडे घालायचे हे ठरवले आहे, तर राघवचे पोशाख अजून ठरलेले नाहीत. पाहुण्यांची यादीही अंतिम करण्यात आली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, राज्यसभा सदस्य कपिल सिब्बल, आपचे खासदार संजय सिंह आणि काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते अभिषेक मनू सिंघवी यांनाही या लग्नाचे निमंत्रण देण्यात आले आहे. या लग्नाला बॉलिवूड इंडस्ट्रीतील दिग्गज कलाकारही हजेरी लावणार आहेत.



# प्राजक्ता कोळीचा साखरपुडा

मिसमॅच्ड फेम अभिनेत्री प्राजक्ता कोळीने तिचा दीर्घकाळापासूनचा बॉयफ्रेंड वृशांक खनालसोबत एंगेजमेंट केली आहे. या जोडप्याने रविवारी एक फोटो पोस्ट करून चाहत्यांसोबत ही आनंदाची बातमी शेअर केली. प्राजक्ताने तिच्या इंस्टाग्राम पोस्टवर लिहिले- 'वृशांक आता माझा बॉयफ्रेंड नाही'. शेअर केलेल्या फोटोमध्ये प्राजक्ता आणि वृषांक त्यांच्या एंगेजमेंट रिंग्ज फ्लॉंट करताना दिसत आहेत. प्राजक्ता आणि वृशांकच्या या सोशल मीडिया पोस्टवर चाहते आणि सेलेब्स तीव्र प्रतिक्रिया देत आहेत. 'नेव्हर हॅव आय एव्हर' अभिनेत्री मैत्रेयी रामकृष्णन हिने कमेंटमध्ये लिहिले - अभिनंदन. अनिल कपूरने लिहिले- 'तुम्हा दोघांचे खूप अभिनंदन, जुग जुग जियो.' प्राजक्ताच्या ऑनस्क्रीन भावाची भूमिका करणाऱ्या वरुण धवननेही मनापासून प्रतिक्रिया दिली. याशिवाय सुनील शेट्टी, भूमी पेडणेकर, अरमान मलिक, बरखा सिंग, भारती सिंग आणि गौहर खान यांच्यासह अनेक सेलिब्रिटींनी या जोडप्याला त्यांच्या लग्नासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# रुबिना दिलायक होणार आहे आई



अभिनेत्री रुबिना दिलायक आई होणार आहे. अलिकडेच तिने तिचा पती आणि अभिनेता अभिनव शुक्लासोबतचा एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली. सध्या रुबिना आणि अभिनव शुक्ला अमेरिकेत सुट्टी घालवत आहेत. या फोटोत रुबिनाचा बेबी बंपही स्पष्ट दिसत आहे. जॉइंट पोस्ट शेअर करताना अभिनव आणि रुबिनाने लिहिले - आम्ही डेटिंग करायला सुरुवात केली तेव्हा आम्ही एकमेकांना वचन दिले होते की संपूर्ण जग फिरू. आम्ही लग्न केले आणि आता आम्ही एक कुटुंब म्हणून आमचा नवीन प्रवास सुरू करत आहेत. लवकरच आमच्यासोबत एक छोटा प्रवासीही असेल. या पोस्टवर अभिनेत्री सृती झा हिने या जोडप्याचे अभिनंदन केले आहे. सिंपल कौल यांनी पोस्टवर लिहिले आहे- वाढदिवसाच्या शुभेच्छा! ही खूप चांगली बातमी आहे. तुम्हा दोघांना खूप खूप प्रेम! सोशल मीडिया यूजर्सनीही या पोस्टवर जोडप्याला शुभेच्छा दिल्या आहेत. एका यूजरने लिहिले- शेवटी तुम्ही प्रेग्नेंसीची अधिकृत घोषणा केली आहे. तुम्हा दोघांचेही खूप खूप अभिनंदन! रुबिना 4 महिन्यांची गरोदर आहे आणि तिच्या बाळाची पुढील वर्षी प्रसूती होऊ शकते. अभिनव शुक्लाने 2018 मध्ये शिमला येथे त्याची दीर्घकाळाची मैत्रीण रुबिनासोबत लग्न केले. अभिनेत्री रुबिना दिलायक आई होणार आहे. अलिकडेच तिने तिचा पती आणि अभिनेता अभिनव शुक्लासोबतचा एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट

# माधुरी साकारणार सरोज खान यांची भूमिका!



दिवंगत कोरिओग्राफर सरोज खान यांच्या जीवनावर बायोपिक बनवला जाणार आहे. निर्माता भूषण कुमार यांनी नुकतेच याला दुजोरा दिला आहे. आता या मालिकेतील मुख्य अभिनेत्रीबाबत एक अपडेट समोर आले आहे. माधुरी दीक्षितला कोरिओग्राफर सरोज खानच्या भूमिकेत कास्ट करण्याचा विचार निर्माते करत असल्याच्या बातम्या आहेत. कोरिओग्राफर सरोज खान यांच्या मुलीनेही बायोपिकमध्ये माधुरी दीक्षितच्या कास्टिंगबद्दल म्हटले आहे. माधुरी दीक्षितने या बायोपिकचा भाग व्हावे असे त्यांना वाटते. बायोपिकबाबतही त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. सरोज खानच्या बायोपिकसाठी अद्याप कोणत्याही अभिनेत्रीचे नाव फायनल झालेले नाही. मात्र, निर्माते माधुरी दीक्षितला कास्ट करण्याचा विचार करत आहेत. सरोज जीच्या आयुष्यातील वेगवेगळे टप्पे दाखवण्यासाठी निर्माते वेगवेगळ्या वयोगटातील कलाकारांच्या शोधात आहेत. सरोज खानवर बनत असलेला हा बायोपिक सध्या लेखनाच्या टप्प्यात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बायोपिकमध्ये बरेच काही समाविष्ट आहे, सरोज खानचे आयुष्य अनेक चढ-उतारांनी भरलेले आहे. अशा परिस्थितीत बायोपिकच्या माध्यमातून ते पडद्यावर दाखवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अशा परिस्थितीत कथेचा कोणता अँगल दाखवायचा हे निर्माते अजूनही ठरवत आहेत. मीडियाशी संबंधित आणखी एका सूत्राने सांगितले- 6 महिन्यांपूर्वी माधुरी दीक्षितला लीड म्हणून कास्ट करण्याची चर्चा होती. तिच्याशी संपर्क करण्यात आला. या व्यक्तिरेखेसाठी ती योग्य निवड आहे.

# अर्ध्या संघाला दाखवला पॅव्हेलियनचा रस्ता!

## केकेआरच्या फिरकीपटूचा टीम इंडियात प्रवेशासाठी दमदार दावा

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यंदा आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे आयोजन १९ फेब्रुवारीपासून केले जाणार असून यजमानपद पाकिस्तानकडे आहे. या स्पर्धेपूर्वी टीम इंडिया घरच्या मैदानावर टी-२० आणि एकदिवसीय मालिकेत इंग्लंडचा सामना करणार आहे. अशा परिस्थितीत टीम इंडियात स्थान मिळवण्यासाठी सर्वच चुरल लागली आहे. दरम्यान, विजय हजारे ट्रॉफीमध्ये वरुण चक्रवर्तीने आपल्या दमदार काममगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या कामगिरीच्या जोरावर त्याने टीम इंडियात स्थान मिळवण्याचा दावा मजबूत केला आहे.**



आजपासून विजय हजारे ट्रॉफीच्या बाद फेरीला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेतील दुसरा प्राथमिक उपांत्यपूर्व सामना राजस्थान आणि तामिळनाडू यांच्यात खेळला जात आहे. वरुण चक्रवर्ती जो आयपीएलमध्ये कोलकात्याकडून खेळतो. पण भारतीय स्थानिक क्रिकेटमध्ये तामिळनाडूकडून खेळताना विजय हजारे ट्रॉफीमध्ये त्याने मोठी कामगिरी केली आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना राजस्थान संघाने चांगली सुरुवात केली, पण त्यानंतर वरुण चक्रवर्तीने अप्रतिम गोलंदाजी केली. चक्रवर्तीच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे राजस्थानचा संघ अवघ्या २६७ धावांत गारद झाला.मिस्ट्री स्पिनर म्हणून प्रसिद्ध असलेल्या वरुण चक्रवर्तीने एकट्याने अर्ध्या राजस्थान संघाला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. चक्रवर्तीने १० षटकात ५२ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. अशाप्रकारे फिरकी गोलंदाजाने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आपला मजबूत दावा केला. त्याची कामगिरी अशा वेळी झाली आहे, जेव्हा इंग्लंडविरुद्धच्या मालिकेव्यतिरिक्त निवड समिती चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघाची निवड करतील.११ जानेवारी रोजी निवडसमिती, प्रशिक्षक आणि कर्णधार रोहित यांची बैठक अपेक्षित आहे. त्यानंतर संघाची घोषणा केली जाऊ शकते. या बैठकीत वरुण चक्रवर्तीच्या नावावरही चर्चा होऊ शकते. कारण कुलदीप यादवच्या फिटनेसवर साशंकता आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये वरुणचा फॉर्म पाहिला तर त्याने या स्पर्धेत आतापर्यंत सर्वाधिक १८ विकेट्स घेतल्या आहेत. अशा स्थितीत चक्रवर्तीच्या या कामगिरीकडे निवडसमितीला अजिबात दुर्लक्ष करता येणार नाही. टीम इंडियासाठी १३ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने खेळलेला वरुण वनडेमध्ये पदार्पणाची वाट पाहत आहे. फीच्या बाद फेरीला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेतील दुसरा प्राथमिक उपांत्यपूर्व सामना राजस्थान आणि तामिळनाडू यांच्यात खेळला जात आहे. वरुण चक्रवर्ती जो आयपीएलमध्ये कोलकात्याकडून खेळतो. पण भारतीय स्थानिक क्रिकेटमध्ये तामिळनाडूकडून खेळताना विजय हजारे ट्रॉफीमध्ये त्याने मोठी कामगिरी केली आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना राजस्थान संघाने चांगली सुरुवात केली, पण त्यानंतर वरुण चक्रवर्तीने अप्रतिम गोलंदाजी केली. चक्रवर्तीच्या उत्कृष्ट गोलंदाजीमुळे राजस्थानचा संघ अवघ्या २६७ धावांत गारद झाला.मिस्ट्री स्पिनर म्हणून प्रसिद्ध असलेल्या वरुण चक्रवर्तीने एकट्याने अर्ध्या राजस्थान संघाला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. चक्रवर्तीने १० षटकात ५२ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. अशाप्रकारे फिरकी गोलंदाजाने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आपला मजबूत दावा केला. त्याची कामगिरी अशा वेळी झाली आहे, जेव्हा इंग्लंडविरुद्धच्या मालिकेव्यतिरिक्त निवड समिती चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघाची निवड करतील.११ जानेवारी रोजी निवडसमिती, प्रशिक्षक आणि कर्णधार रोहित यांची बैठक अपेक्षित आहे. त्यानंतर संघाची घोषणा केली जाऊ शकते. या बैठकीत वरुण चक्रवर्तीच्या नावावरही चर्चा होऊ शकते. कारण कुलदीप यादवच्या फिटनेसवर साशंकता आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये वरुणचा फॉर्म पाहिला तर त्याने या स्पर्धेत आतापर्यंत सर्वाधिक १८ विकेट्स घेतल्या आहेत.

### वरुण चक्रवर्तीचा कहर

अशा स्थितीत चक्रवर्तीच्या या कामगिरीकडे निवडसमितीला अजिबात दुर्लक्ष करता येणार नाही. टीम इंडियासाठी १३ टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने खेळलेला वरुण वनडेमध्ये पदार्पणाची वाट पाहत आहे.यंदा आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे आयोजन १९ फेब्रुवारीपासून केले जाणार असून यजमानपद पाकिस्तानकडे आहे. या स्पर्धेपूर्वी टीम इंडिया घरच्या मैदानावर टी-२० आणि एकदिवसीय मालिकेत इंग्लंडचा सामना करणार आहे. अशा परिस्थितीत टीम इंडियात स्थान मिळवण्यासाठी सर्वच चुरल लागली आहे. दरम्यान, विजय हजारे ट्रॉफीमध्ये वरुण चक्रवर्तीने आपल्या दमदार काममगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या कामगिरीच्या जोरावर त्याने टीम इंडियात स्थान मिळवण्याचा दावा मजबूत केला आहे.आजपासून विजय हजारे ट्रॉफीच्या बाद फेरीला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेतील दुसरा प्राथमिक उपांत्यपूर्व सामना राजस्थान आणि तामिळनाडू यांच्यात खेळला जात आहे.

# मोहम्मद शमी पुनरागमनासाठी सज्ज!

## हरियाणाविरुद्धच्या मोहम्मद शमीने घेतल्या तीन विकेट्स

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी एकापाठोपाठ एक चमकदार कामगिरी करत टीम इंडियाचे दरवाजे ठोठावत आहे. गेल्या वर्षी एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यानंतर वर्षभर क्रिकेटपासून दूर असलेला शमी परतल्यानंतर चमकदार कामगिरी करत आहे. त्याने आपला उत्कृष्ट फॉर्म सुरू ठेवताना गुरुवारी विजय हजारे ट्रॉफीच्या बाद फेरीत हरियाणाविरुद्धच्या सामन्यात दमदार गोलंदाजी केली.**



या सामन्यात त्याची सुरुवात खराब झाली होती, मात्र, त्यानंतर फलंदाजांना शमीने आपल्यापुढे घुडगे टेकायला लावले.मोहम्मद शमीने हरियाणाविरुद्धच्या बाद फेरीत ८ षटकांत ४८ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. त्याचा पहिला बळी हिमांशू राणा हा सहाव्या षटकात यष्टिरक्षक अभिषेक पोरेलने झेलबाद झाला.

शमीने त्याच्या पहिल्या स्पेलच्या उरलेल्या षटकांमध्ये ६.६७ च्या इकॉनॉमी रेटने ४० धावा दिल्या. ४२ व्या षटकात त्याने दिनेश बानाला बाद करताना आपली दुसरी विकेट घेतली. शमीने लवकरच अंशुल कंबोजला पॅव्हेलियनमध्ये पाठवले आणि सामन्यातील आपली तिसरी विकेट घेतली. या सामन्यात डावाच्या सुरुवातीला सलामीवीर अर्श रंगाने शमीच्या चेंडूवर दोन षटकार ठोकले होते. विशेष म्हणजे निवड समिती बाद फेरीचा सामना पाहण्यासाठी स्टेडियममध्ये उपस्थित असल्याची माहिती आहे. इंग्लंडविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिका आणि पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी बीसीसीआय लवकरच संघ जाहीर करणार आहे. अशा परिस्थितीत शमी वर्षभरानंतर राष्ट्रीय संघात पुनरागमन करेल अशी पूर्ण आशा आहे.

### मोहम्मद शमीचे जबरदस्त कमबॅक

२०२४ च्या सुरुवातीला एकदिवसीय विश्वचषकादरम्यान घोट्याला दुखापत झाल्यानंतर शमीवर शस्त्रक्रिया करावी लागली. त्यानंतर नॅशनल क्रिकेट अकादमी (एनसीए) मध्ये त्याने रिकव्हरीला सुरुवात केली आणि रणजी ट्रॉफीमध्ये पुनरागमन केले. त्यानंतर त्याने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये भाग घेतला आणि त्यानंतर विजय हजारे ट्रॉफीच्या प्राथमिक फेरीच्या सामन्यांसाठी त्याला विश्रांती देण्यात आली. मात्र, आता तो भारताच्या चॅम्पियन्स ट्रॉफी संघात स्थान मिळवण्याच्या जवळ आहे.